**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**<u>नाणी मोजणी व वर्गीकरण करण्याचे मशिन पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.</u>**

नाणी मोजणी व वर्गीकरण (Coin Counting & Sorting) करण्याचे मशिन पुरवठा करणेकामी जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहे. या संबंधीची माहिती, अटी व शर्ती संत तुकाराम भवन, पंढरपूर व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. दरपत्रक व डेमो मशिन ऑपरेटरसह कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे कार्यालयात दिनांक ०७/०९/२०१७ रोजी स.११.००वा. उपस्थित रहावे.

क्र.लेखा विभाग/कावि/१००८/२०१७ दि.१९/०७/२०१७ स्वा/—

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०, ९९७५८५३५७७)

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर.**

**नाणी मोजणी व वर्गीकरण (Coin Counting & Sorting) करण्याचे मशिन पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. सदर पुरवठा कामाची माहिती, अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संत तुकाराम भवन व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध होवून मिळतील. तसेच सदरचे पुरवठा कामाचे दरपत्रक, डेमो मशिन ऑपरेटरसह कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे कार्यालयात दिनांक ०७/०९/२०१७ रोजी स.११.००वा. प्रेझेनटेंशनसाठी उपस्थित रहावे. यावेळी सदर मशिनचा डेमो दाखवणे आवश्यक राहील.

२. सदरचे मशिन २ नग पुरवठा करावयाचे आहे.

३. दरपत्रकामध्ये मशिनचा दर सर्व करासहीत व पोहोच खर्चासह नमुद करावा.

४. सदरच्या मशिनमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या मशिनद्वारे नाणी मोजणी करून नाण्यांचे वर्गीकरण (Coin Counting & Sorting) करण्याची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

५. सदर मशिनची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे.

६. सदरच्या मशिनला वॉरंटी व गॅरंटी असणे आवश्यक आहे. वॉरंटी कालावधीत सदर मशिनची देखभाल दुरूस्ती श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे येवून मोफत करावी लागेल.

७. सदरची मशिन पुरवठा केल्यानंतर त्यांची वेळोवेळी तपासणी, दुरूस्ती व सर्व्हिसिंग करण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

८. सदर मशिन पुरवठा करण्याचा कालावधी पुरवठा आदेश दिल्यापासून एक वर्ष राहील.

९. सदरचे दरपत्रक सादर करतेवेळी खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

(१) पूर्वी पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.

(२) पॅनकार्ड.

(३) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

(४) आधारकार्ड.

(५) व्यवसाय परवाना.

(६) शॉप ॲक्ट लायसन्स.

१०. सदर मशिनचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मशिनच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

११. मशिन खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१२. पुरवठा करण्यात आलेल्या मशिनची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१३. दरपत्रकात नमुद नाणी मोजणी मशिनचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१४. सदर मशिन खरेदी करताना मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर पुरवठा कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१५. सदर पुरवठा कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१६. मशिनचा पुरवठा लेखा विभाग, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे करणे आवश्यक आहे.

१७. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१८. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१९. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

२०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक/पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थिगीत अथवा रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२१. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२२. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

———//———